## L. A. BILL No. XLVIII OF 2023.

*A BILL*

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA GOODS AND SERVICES TAX ACT, 2017.

**सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४८.**

**महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक ८ डिसेंबर, २०२३ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**(विधानपरिषदेने दिनांक ११ डिसेंबर, २०२३ रोजी शिफारशींशिवाय परत केल्याप्रमाणे.)**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

२०१७ चा महा. ४३. २०२३ चा महा. अध्या.७.

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ यात आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि म्हणून, त्यांनी दिनांक २६ सप्टेंबर २०२३ रोजी महाराष्ट्र वस्तू व सेवा कर (सुधारणा) अध्यादेश, २०२३ हा प्रख्यापित केला होता ;

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या चौ-याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र वस्तू व सेवा कर (दुसरी सुधारणा) अधिनियम, २०२३, असे म्हणावे. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

(२) कलम १, दिनांक २६ सप्टेंबर २०२३ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल आणि उर्वरित कलमे, राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास अंमलात येतील :

परंतु, या अधिनियमाच्या वेगवेगळ्या तरतुदींकरिता वेगवेगळे दिनांक नियत करता येतील आणि या अधिनियमाच्या प्रारंभाच्या अशा कोणत्याही तरतुदीमधील कोणत्याही संदर्भाचा, ती तरतूद अंमलात येण्याचा संदर्भ म्हणून अन्वयार्थ लावण्यात येईल.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम २ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ (यात यापुढे ज्याचा निर्देश, " मुख्य अधिनियम " असा केला आहे) याच्या कलम २ मध्ये,— २०१७ चा महा. ४३.

(क) खंड (८०) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येतील :—

" (८०क) " ऑनलाईन खेळ " याचा अर्थ, इंटरनेट किंवा इलेक्ट्रॉनिक नेटवर्कवर एखादा खेळ देऊ करणे, असा आहे आणि त्यात, ऑनलाईन पैशाच्या खेळाचा समावेश होतो ;

(८०ख) " ऑनलाईन पैशाचा खेळ " याचा अर्थ, खेळ, योजना, स्पर्धा किंवा अन्य कोणताही उपक्रम किंवा प्रक्रिया यांसह खेळाच्या कोणत्याही स्पर्धा प्रकारामध्ये,— मग त्याची फलनिष्पत्ती किंवा कामगिरी कौशल्यावर, संधीवर किंवा या दोन्हींवर आधारित असो किंवा नसो आणि ते, त्या त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यान्वये परवानगीयोग्य किंवा अन्यथा असो,— ज्यामध्ये खेळाडू, आभासी डिजिटल मत्तांसह पैसे किंवा पैशाचे मूल्य जिंकण्याच्या अपेक्षेने, आभासी डिजिटल मत्तांसह पैसे किंवा पैशाचे मूल्य प्रदान करतात किंवा जमा करतात असा ऑनलाईन खेळ, असा आहे ; ";

(ख) खंड (१०२) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

" (१०२क) " विनिर्दिष्ट केलेला कारवाईयोग्य मागणीहक्क " याचा अर्थ,—

(एक) सट्टेबाजी ;

(दोन) कॅसिनो ;

(तीन) जुगार ;

(चार) घोड्यांची शर्यत ;

(पाच) लॉटरी ; किंवा

(सहा) ऑनलाईन पैशाचा खेळ ;

यांमध्ये किंवा त्याच्या परिणामी उद्‌भवलेला कारवाईयोग्य मागणीहक्क, असा आहे ; ";

(ग) खंड (१०५) मध्ये, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

" परंतु, जी व्यक्ती, पुरवठ्याकरिता डिजिटल किंवा इलेक्ट्रॉनिक प्लॅटफॉर्मची मालक आहे, तो चालविते किंवा त्याचे व्यवस्थापन करते अशा व्यक्तीसह, जी व्यक्ती, विनिर्दिष्ट केलेल्या कारवाईयोग्य मागणीहक्कांच्या अशा पुरवठ्याचे, प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे आयोजन करते किंवा व्यवस्था करते अशी व्यक्ती, अशा कारवाईयोग्य मागणीहक्कांच्या, मग असे कारवाईयोग्य मागणीहक्क तिच्याद्वारे किंवा तिच्यामार्फत पुरवठा केले जात असो आणि अशा कारवाईयोग्य मागणीहक्कांच्या पुरवठा करण्यासाठी अशा आभासी डिजिटल मत्तांसह पैशामध्ये किंवा पैशाच्या मूल्यामध्ये मोबदला, तिला किंवा तिच्यामार्फत प्रदान केला जात असो किंवा अभिहस्तांतरित केला जात असो अथवा कोणत्याही रीतीने तिच्या स्वाधीन केला जात असो,— पुरवठादार असल्याचे मानण्यात येईल, आणि या अधिनियमाच्या सर्व तरतुदी, जणू काही ती, अशा कारवाईयोग्य मागणीहक्कांच्या पुरवठ्याच्या संबंधातील कर प्रदान करण्यास पात्र असलेली पुरवठादार आहे असे समजून, विनिर्दिष्ट केलेल्या कारवाईयोग्य मागणीहक्कांच्या अशा पुरवठ्यास, लागू असतील ; ";

(घ) खंड (११७) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

" (११७क) " आभासी डिजिटल मत्ता " यास, आयकर अधिनियम, १९६१ याच्या कलम २ च्या खंड (४७क) मध्ये जो अर्थ नेमून दिलेला असेल तोच अर्थ असेल ; ". १९६१ चा ४३.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम २४ मध्ये,—

(क) खंड (अकरा) मधील, शेवटी आलेला " आणि " हा मजकूर वगळण्यात येईल ;

(ख) खंड (अकरा) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

" (अकरा-क) भारताबाहेरील एखाद्या ठिकाणाहून भारतातील एखाद्या व्यक्तीला ऑनलाईन पैशांच्या खेळाचा पुरवठा करणारी प्रत्येक व्यक्ती ; आणि ".

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या कलम २४ ची सुधारणा.

**४.** मुख्य अधिनियमास जोडलेल्या अनुसूची तीन मधील, परिच्छेद ६ मध्ये, " लॉटरी, सट्टेबाजी व जुगार " या मजकुराऐवजी, " विनिर्दिष्ट केलेले कारवाईयोग्य मागणीहक्क " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ याच्या अनुसूची तीन ची सुधारणा.

**५.** या अधिनियमान्वये केलेल्या सुधारणांमुळे, सट्टेबाजी, कॅसिनो, जुगार, घोड्यांची शर्यत, लॉटरी किंवा ऑनलाईन खेळ यांस मनाई करण्यासाठी, त्यांवर निर्बंध घालण्यासाठी किंवा त्यांचे विनियमन करण्यासाठी तरतूद करणा-या, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याच्या तरतुदींना बाधा येणार नाही.

संक्रमणात्मक तरतुदी.

२०२३ चा महा. अध्या. ७.

**६.** (१) महाराष्ट्र वस्तू व सेवा कर (सुधारणा) अध्यादेश, २०२३, हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे.

(२) अशा प्रकारे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कोणतीही कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश यांसह) ही, या अधिनियमान्वये सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा, यथास्थिति, काढण्यात आलेली अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

सन २०२३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ७ याचे निरसन व व्यावृत्ती.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४८.]**

**[महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[श्री. अजित पवार,**
उप मुख्यमंत्री.**]**

**[विधानसभेने दिनांक ८ डिसेंबर, २०२३ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**[विधानपरिषदेने दिनांक ११ डिसेंबर, २०२३ रोजी शिफारशींशिवाय परत केल्याप्रमाणे.]**

**जितेंद्र भोळे,**
सचिव(१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मुद्रणालय, नागपूर